19 NOV 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अवनिश पाटील, पोपट पाटील गुणवंत शिक्षक

## शिवाजी विद्यापीठाकडून गौरव : 'नॅक' मानांकित महाविद्यालयांचाही सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठातील गुणवंत शिक्षकांचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

विद्यापीठातील गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश रामकृष्ण पाटील यांना, तर बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार पलूस (जि. सांगली) येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या डॉ. पोपट महादेव पाटील यांना, तर कै. प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार राजाराम महाविद्यालयातील डॉ. अंजली राजेंद्र पाटील यांना सोमवारी प्रदान करण्यात आला.

उत्कृष्ट अधिविभागांसाठीचा पुरस्कार जीवरसायनशास्त्र आणि मराठी अधिविभाग यांना देण्यात आला. 'नॅक'चे 'अ' आणि 'अ' मानांकन मिळविणाऱ्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार झाला.




शिवाजी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक पुरस्कार डॉ. अवनिश पाटील यांना सोमवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव व डॉ. सुहासिनी पाटील उपस्थित होत्या.

### विद्यापीठातील गुणवंत प्रशासकीय सेवक

- डॉ. प्रल्हाद बाबूराव जाखले, सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग
- सुनील जयवंत देसाई, अधीक्षक, पी.जी. बिल्स विभाग
- गणपती बाळाप्पा मस्ती, मेस्त्री, अभियांत्रिकी विभाग
- तात्यासो निवृत्ती करपे, हवालदार, महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग

### गुणवंत प्राचार्य :

- डॉ. शिवलिंग गंगाधर मेनकुदळे, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

### गुणवंत शिक्षक

- प्रा.डॉ. राजेश काशीनाथ निमट, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा

### गुणवंत सेवक :

- धनाजी शिवाजी पाटील, मुख्य लिपिक, अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, आष्टा
- मोहन बाळासाहेब माने, ग्रंथालय परिचर, लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, सातारा

19 NOV 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे संशोधनकार्य कौतुकास्पद

## सुरेश गोसावी : शिवाजी विद्यापीठाचा ६२वा वर्धापनदिन उत्साहात; पुढील वर्षापासून विविध उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने परिक्षेत्रातील ग्रामीण भागातील घराघरांत शिक्षणाची गंगा प्रवाहित करण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्याचप्रमाणे संशोधनाच्या क्षेत्रातही आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा उमटविला आहे. विद्यापीठाची ही कामगिरी कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी सोमवारी काढले.




शिवाजी विद्यापीठाच्या ६२व्या वर्धापनदिन समारंभात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे व डॉ. सुहासिनी जाधव उपस्थित होत्या.

विद्यापीठाच्या ६२व्या वर्धापनदिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या समारंभात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. गोसावी म्हणाले, कोल्हापूर ही समाजसुधारक, कलावंत, विचारवंत, कार्यकर्ते, विद्वान यांची भूमी आहे. विद्यापीठाने या विभागाच्या शैक्षणिक व संशोधकीय विकासासाठी मोलाचे कार्य केले आहे. येथील विविध विद्याशाखांमध्ये सुरू असलेल्या संशोधनकार्याचा ठसा केवळ राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटविला गेला आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अभ्यासपूर्ण पद्धतीने अंमलात आणले आहे. धोरणाविषयी सर्व घटकांत जागृती घडवून आणून सर्वंकष सहभाग मिळविण्याच्या दृष्टीने काम केले आहे. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसमवेत टीचर-स्टुडंट एक्सचेंज, रिसर्च स्कॉलर एक्सचेंज उपक्रम पुढील वर्षापासून कार्यान्वित होतील.

### शाहूंचा सर्वदूर प्रभाव

कोल्हापूरच्या मातीला, माणसांना स्वतःचा एक पोत, अभिमान आणि संस्कृती आहे. या संस्कृतीला द्रष्टेपणाने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सर्वदूर महत्त्व प्राप्त करून दिले. सव्वाशे वर्षांपूर्वी सामाजिक आरक्षणाचा निर्णय घेतला. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या आशयबदलावर शाहू महाराजांचा प्रचंड प्रभाव असल्याचे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. गोसावी यांनी काढले.

### 'हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ' ग्रंथाचे प्रकाशन

विद्यापीठाच्या स्थापनेपासून म्हणजे सन १९६२ ते २०२१ या साठ वर्षांच्या कालावधीतील वाटचालीचा आढावा घेणाऱ्या 'हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. ग्रंथाचे मुख्य संपादक डॉ. भालबा विभुते डॉ. टी. एस. पाटील, डॉ. इस्माईल पठाण यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार झाला.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख आदी उपस्थित होत्या.





कोल्हापूर : १) शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिन समारंभात बोलताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी. २) विज्ञान व तंत्रज्ञान गटातील उत्कृष्ट अधिविभागासाठीचा पुरस्कार स्वीकारताना जीवरसायनशास्त्र अधिविभागाच्या डॉ. ज्योती जाधव, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. पंकज पवार आदी.

# भारतीय शिक्षणाचे भवितव्य विद्यापीठांच्या हाती

## कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी; शिवाजी विद्यापीठ वर्धापनदिन उत्साहात

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

सकारात्मक सामाजिक बदलांसाठी रचनात्मक चर्चा होणे आवश्यक असते. त्यासाठी पोषक शैक्षणिक वातावरण निर्मितीची जबाबदारी विद्यापीठांनी उचलणे आवश्यक आहे. भारतीय शिक्षणाचे भवितव्य विद्यापीठांच्या हाती आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या वर्धापन दिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. वर्धापन दिन कार्यक्रमात यंदा उत्कृष्ट अधिविभागांसाठीचा पुरस्कार जीवरसायनशास्त्र आणि मराठी अधिविभाग यांना प्रदान करण्यात आला.

कुलगुरू डॉ. गोसावी म्हणाले, गेल्या ६२ वर्षांमध्ये शिवाजी विद्यापीठाने या विभागाच्या शैक्षणिक व संशोधकीय विकासासाठी मोलाचे कार्य केले आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मुक्त, मूल्याधिष्ठित समाजनिर्मितीसाठी विचार, मंथन करण्यासाठी प्रेरित करण्याची गरज आहे. व्यापक आंतरराष्ट्रीय चित्रामध्ये संशोधनाचे स्थान अधोरेखित करण्याच्या दृष्टीने त्यांना विचार होणे आवश्यक आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अभ्यासपूर्ण पद्धतीने विद्यापीठाने अंमलात आणले आहे. धोरणाविषयी सर्व घटकांत जागृती घडवून आणून सर्वंकष सहभाग मिळविण्याच्या दृष्टीने काम सुरू आहे. शाश्वत समाजाच्या निर्मितीसाठी विद्यापीठाने कालसुसंगत अभिनव अभ्यासक्रम सुरू केले आहेत. हिरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ ग्रंथाचे प्रकाशन झाले. 'नॅक'चे 'अ+' व 'अ' मानांकन मिळविणाऱ्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार झाला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर आदी उपस्थित होते. तत्पूर्वी, विद्यापीठाच्या प्रांगणात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले.

### विविध पुरस्कार विजेते शिक्षक, प्राचार्य...

- **विद्यापीठातील गुणवंत शिक्षक** - प्रा. डॉ. अवनिश पाटील, इतिहास अधिविभाग.
- **विद्यापीठातील गुणवंत प्रशासकीय सेवक**- डॉ. प्रल्हाद जाखले, सहाय्यक कुलसचिव,सुनिल देसाई, अधीक्षक, गणपती मेस्त्री, तात्यासाहेब करपे.
- **संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य** - डॉ. शिवलिंग मेनकुदळे, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
- **संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक** - प्रा. डॉ. राजेश निमट, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा. महाविद्यालयीन गुणवंत सेवक - धनाजी पाटील, मुख्य लिपिक, मोहन माने, ग्रंथालय परिचर.
- **बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार** - डॉ. पोपट पाटील, सांगली
- **प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार**- डॉ. अंजली पाटील, कोल्हापूर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2024
पुढारी

# आंतरविभागीय महिला फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन

**गडहिंग्लज :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडांगणावर आंतरविभागीय महिला फुटबॉल स्पर्धेचा प्रारंभ झाला. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांनी नाणेफेक करून स्पर्धेचे उद्घाटन केले. वैशाली पाटील प्रमुख उपस्थित होत्या. प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत केले. डॉ. सूरज बिडकर यांनी सूत्रसंचालन केले. क्रीडा संचालक प्रा. विकास अतिग्रे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2024
पुढारी

# आंतरविभागीय महिला फुटबॉल स्पर्धेस प्रारंभ

**गडहिंग्लज :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व डॉ. घाळी कॉलेज यांच्या वतीने शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडांगणावर आंतरविभागीय महिला फुटबॉल स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेचे उद्‌घाटन वैशाली पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी त्यांनी, प्रत्येक खेळाडूंनी आपल्या तब्येतीची काळजी घेतली पाहिजे आणि आपल्या जीवनाला शिस्त लावली पाहिजे, असा संदेश दिला. प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत केले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांनी नाणेफेक करुन स्पर्धेचे उद्‌घाटन केले. शिवराज कॉलेज गडहिंग्लज व विवेकानंद कॉलेज कोल्हापूर या संघामध्ये पहिला फुटबॉल सामना झाला. डॉ. सरोज बिडकर यांनी सूत्रसंचालन केले. विकास अतिग्रे यांनी आभार मानले.

19 NOV 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ वर्धापनदिनी गुणवंत शिक्षकांचा गौरव

## अवनीश पाटील, पोपट पाटील, अंजली पाटील पुरस्काराने सन्मानित



कोल्हापूर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते विद्यापीठातील गुणवंत शिक्षक पुरस्कार स्वीकारताना डॉ. अवनीश पाटील. यावेळी शेजारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील उपस्थित होत्या.

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या वर्धापनदिनी गुणवंत शिक्षक, कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

विद्यापीठातील गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांना, तर बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार पलूस (जि. सांगली) येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या डॉ. पोपट पाटील यांना, तर प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार राजाराम महाविद्यालयातील डॉ. अंजली पाटील यांना प्रदान करण्यात आला. उत्कृष्ट अधिविभागांसाठीचा पुरस्कार जीवरसायनशास्त्र आणि मराठी अधिविभाग यांना देण्यात आला. दहा लाख रुपये, प्रमाणपत्र आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

विद्यापीठातील गुणवंत प्रशासकीय सेवकांमध्ये डॉ. प्रल्हाद जाखले, सुनील देसाई, गणपती मस्ती, तात्यासो करपे यांना, तर संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्यांमध्ये डॉ. शिवलिंग मेनकुदळे, संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षकांमध्ये प्रा. डॉ. राजेश निमट, महाविद्यालयीन गुणवंत सेवकांमध्ये धनाजी पाटील, मोहन माने यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी पसायदान, राष्ट्रगीत व विद्यापीठ गीत सादर केले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. दरम्यान, तत्पूर्वी विद्यापीठाच्या प्रांगणात प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. गोसावी यांनी शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी ध्वजवंदन केले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले, श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, सरिता ठकार, धनंजय सुतार, शरद बनसोडे, रामचंद्र पवार, सागर डेळेकर उपस्थित होते.

19 NOV 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक समस्यांवर विद्यापीठांनी एकत्र काम करावे

## कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी : शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा वर्धापन दिन उत्साहात

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : 'शिवाजी विद्यापीठाने आपल्या परिक्षेत्रातील ग्रामीण भागातील घराघरांत शिक्षणाची गंगा प्रवाहित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. संशोधनाच्या क्षेत्रातही आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा उमटविला आहे. विद्यापीठाची ही कामगिरी कौतुकास्पद आहे. पर्यावरण, सामाजिक आरोग्य, मानसिक आरोग्य आदी सामाजिक समस्यांवर विद्यापीठांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज निर्माण झाली आहे', असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या वर्धापन दिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील या समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या वर्धापन दिन समारंभात 'हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ' या ग्रंथाचे प्रकाशन करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी डावीकडून डॉ. रघुनाथ ढमकले, अजितसिंह जाधव, पी. एस. पाटील, भालबा विभूते, इस्माईल पठाण, टी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. गोसावी म्हणाले, 'भारतीय शिक्षणाचे भवितव्य विद्यापीठांच्या हाती आहे. सकारात्मक सामाजिक बदलांसाठी रचनात्मक चर्चा होणे आवश्यक असते. त्यासाठी पोषक शैक्षणिक वातावरण निर्मितीची जबाबदारी विद्यापीठांनी उचलणे आवश्यक आहे. कोल्हापूरच्या मातीला, माणसांना स्वतःचा एक पोत, अभिमान आणि संस्कृती आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या आशयाबदलावर राजर्षी शाहू महाराजांचा प्रचंड प्रभाव आहे.'

या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठाच्या वाटचालीचा आढावा मांडला. विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने अमलात आणले आहे. देशविदेशांतील प्रथितयश संस्थांसमवेत सामंजस्य करार केले आहेत. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसमवेत टिचर-स्टुडंट एक्स्चेंज, रिसर्च स्कॉलर एक्स्चेंज उपक्रम पुढील वर्षापासून कार्यान्वित होतील. शाश्वत समाजाच्या निर्मितीसाठी विद्यापीठाने कालसुसंगत अभिनव अभ्यासक्रम सुरू केले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

### 'हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ' ग्रंथाचे प्रकाशन

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून म्हणजे १९६२ ते २०२१ या साठ वर्षांच्या कालावधीतील वाटचालीचा आढावा घेणाऱ्या 'हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ' या ग्रंथाचे प्रकाशन यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथाचे मुख्य संपादक डॉ. भालबा विभूते, इतिहास लेखन समितीचे सदस्य डॉ. टी. एस. पाटील, इस्माईल पठाण यांचा सत्कार करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2024
सकाळ



कोल्हापूर : आंतरविभागीय महिला फुटबॉल स्पर्धेचे उद्‍घाटन झाले. याप्रसंगी वैशाली पाटील, डॉ. सतीश घाळी, डॉ. दत्ता पाटील, डॉ. सरोज बिडकर, प्रा. विकास अतिग्रे आदी उपस्थित होते.

# आंतरविभागीय महिला फुटबॉल स्पर्धेला प्रारंभ

■ सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. १८ : आंतरविभागीय महिला फुटबॉल स्पर्धेला प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठ व येथील डॉ. घाळी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडांगणावर ही स्पर्धा होत आहे.

वैशाली पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‍घाटन झाले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रत्येक खेळाडूने आपल्या जीवनाला शिस्त लावली पाहिजे, असे मत वैशाली पाटील यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सरोज बिडकर यांनी सूत्रसंचालन केले. शारीरिक शिक्षण संचालक विकास अतिग्रे यांनी आभार मानले.

दरम्यान, शिवराज महाविद्यालय (गडहिंग्लज) व विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर) यांच्यात सलामीचा सामना झाला. सामन्यात विवेकानंद कॉलेजने शिवराज महाविद्यालयावर १-० असा विजय मिळविला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2024
सकाळ




कोल्हापूर : दिवस मावळतीला जाताना आकाशामध्ये रंग-प्रकाशाचा अनोखा खेळ पहायला मिळतो. मात्र, प्रत्यक्ष मावळतीवेळचा अनुभव काही औरच. शिवाजी विद्यापीठ परिसरातील हे अनोखे प्रतिबिंब.

(नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

19 NOV 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधनकार्य कौतुकास्पद

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांचे गौरवोद्‌गार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने आपल्या परिक्षेत्रातील ग्रामीण भागातील घराघरांत शिक्षणाची गंगा प्रवाहित करण्याचे कार्य केले आहे. त्याचप्रमाणे संशोधनाच्या क्षेत्रातही आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटविला आहे. शिवाजी विद्यापीठाची ही कामगिरी कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्‌गार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी काढले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी विज्ञान व तंत्रज्ञान गटातील उत्कृष्ट अधिविभागासाठीचा पुरस्कार स्वीकारताना डॉ. ज्योती जाधव, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. पंकज पवार आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्यां वर्धापन दिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. याप्रसंगी महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांची गुणवंत पाल्ये यांचा विद्यापीठ प्रशासकीय तसेच कल्याण निधी पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. तसेच, प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कार प्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले. 'हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ' या ग्रंथाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथाचे मुख्य संपादक डॉ. भालबा विभूते, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. इस्माईल पठाण यांचा सत्कार करण्यात आला.

कुलगुरू डॉ. गोसावी म्हणाले, कोल्हापूर ही समाजसुधारक, कलावंत, विचारवंत, कार्यकर्ते, विद्वान यांची भूमी आहे. शैक्षणिक गरजांच्या प्रतिपूर्तीसाठी स्वतंत्र शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली. तेव्हापासून गेल्या ६२ वर्षांमध्ये विद्यापीठाने ॥ शैक्षणिक व संशोधनात मोलाचे कार्य केले आहे. संशोधनकार्याचा ठसा केवळ राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटविला आहे. पश्चिम घाटाच्या संवर्धनासह लीड बॉटनिकल गार्डनमध्ये देशभरातील दुर्मिळ वनस्पतींचे संवर्धन करण्याचे काम केले जाते. पर्यावरण, सामाजिक आरोग्य, मानसिक आरोग्य आदी सामाजिक समस्यांवर विद्यापीठांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज निर्माण आहे.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली. विद्यापीठाने देशविदेशांतील प्रथितयश संस्थांसमवेत सामंजस्य करार केले आहेत. ऑटोमेशनच्या बाबतीतही विद्यापीठाने आघाडी घेतली आहे. दीक्षान्तसह पीएच.डी., एस.आर.पी.डी. आदी काम कागदविरहित केले आहे. ही सॉफ्टवेअर विद्यापीठाने स्वत: तयार केली आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत, प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2024
तरुण भारत



# निवडणूक निरीक्षकांची विद्यापीठास भेट

कोल्हापूर : निवडणूक निरीक्षक (सामान्य) मीर तारीक अली यांनी शनिवारी शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागास भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या माध्यमातून निवडणूक साक्षरता व मतदान जनजागृतीबाबत करण्यात येत असलेल्या कामाचा आढावा घेतला.

अली यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही एन शिंदे, आय क्यू ए सी संचालक डॉ. सागर रेडेकर आणि वाणिज्य विभाग अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्याशी चर्चा करुन मौलिक सूचना केल्या. विद्यापीठाच्या जलस्वयंपूर्णतेबाबत तसेच ऊर्जा स्वयंपूर्णतेबाबतही त्यांनी समाधान व्यक्त करून भविष्यात आणखी सुधारणा होण्याच्या दृष्टीने सूचना केल्या.

यावेळी एनएसएस विभागाचे संचालक डॉ. टी.एम चौगले यांनी विद्यापीठाच्या माध्यमातून कोल्हापूर, सांगली आणि सातार्‍यामध्ये होत असलेले निवडणूक साक्षरतेचे काम आणि निवडणुकीसाठी प्रत्येक महाविद्यालयात स्थापन झालेल्या निवडणूक साक्षरता मंचाबाबत त्यांना माहिती दिली. मतदान प्रक्रिया सुलभ होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी पोलीस मित्र म्हणून तसेच प्रत्येक बुथवर सहाय्यक म्हणून कार्यरत राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2024
तरुण भारत

# विद्यापीठात पंडीत नेहरू यांना अभिवादन

**कोल्हापूर :** स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यापरिषद सदस्य डॉ. जयवंत इंगळे, नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2024
तरुण भारत

# व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२४ मधील व्यवसायिक अभ्यासक्रमाचे परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रवेशित प्रथम वर्ष, प्रथम सत्र फ्रेश विद्यार्थी, व थेट व्दितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याची संधी दिली आहे. विनाविलंब शुल्कासह २६ नोव्हेंबरपर्यंत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे. विलंब शुल्कासह २८ नोव्हेंबरपर्यंत तर अतिविलंब शुल्कासह ३० नोव्हेंबरपर्यंत विद्यार्थ्यांनी अर्ज भरावयाचा आहे. महाविद्यालय किंवा अधिविभागांनी विद्यापीठातील परीक्षा विभागात विनाविलंब शुल्कासह २९ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाच्या आहेत. विलंब शुल्कासह व अतिविलंब शुल्कासह ३ डिसेंबरपर्यंत विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाच्या आहेत. तरी विद्यार्थी, महाविद्यालय व अधिविभागांनी वेळेत अर्ज भरावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2024
तरुण भारत

# विद्यापीठात बिरसा मुंडा यांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामार्फत बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र -कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. दत्तात्रय मचाले, प्रशासकीय विभागातील अधिकारी, इतिहास विभागातील कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2024
Times of India

# SUK celebrates foundation day

**Kolhapur**: Dr. Suresh Gosavi, vice-chancellor of Savitribai Phule Pune University, praised Shivaji University, Kolhapur (SUK) for its significant contributions to education and research during the 62nd Foundation Day celebration. He emphasized the role of universities in fostering critical thinking and addressing social issues. SUK's progress under the National Education Policy was also highlighted, alongside awards for outstanding departments and meritorious teachers. TNN